aglasem.com

FOR MAHARASHTRA BOARD (MSBSHSE) CLASS 9 EXAM PREPARATION

Maharashtra Board (MSBSHSE) Class 9 2026 Question Paper · History & Political Science

EXAM
Maharashtra Board (MSBSHSE) Class 9

YEAR
2026

TYPE
Question Paper

SUBJECT
History & Political Science

द्वितीय सत्र परीक्षा

२०२५-२६

इतिहास व राज्यशास्त्र (कृतिपत्रिका)

माध्यम- मराठी

पेपर नं. ४६

इयत्ता: तुकडी:

हजेरी क्र.:

दिनांक:

वेळ : २ तास

एकूण गुण : ४०

पृष्ठ संख्या : ३

सूचना : १) सर्व कृती/प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

२) उजवीकडील अंक प्रश्नाचे / कृतीचे गुण दर्शवितात.

३) प्र.क्र. १ ते ५ प्रश्न / कृती इतिहास व प्रश्न क्र. ६ ते ९ प्रश्न /कृती राज्यशास्त्र या विषयावरील आहेत.

४) प्र.क्र. १ अ व प्र.क्र. ६ मध्ये संपूर्ण विधाने लिहिणे आवश्यक आहे.

५) प्र.क्र. २ अ मधील आणि ८ (ब) मधील दिलेली माहिती संकल्पनाचित्रे त्याच नमूना आराखड्यानूसार पेनाने उत्तरपत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

- इतिहास -

प्र. १ अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा. (३)

१) इ.स १९९२ मध्ये ..... या राज्यात मदयपान विरोधी चळवळ सुरू करण्यात आली.

अ) महाराष्ट्र ब) गुजरात क) आंध्र प्रदेश ड) उत्तराखंड

२) अणुऊर्जा आयोगाचे पहिले अध्यक्ष म्हणून ..... यांची नेमणूक झाली.

अ) डॉ. होमी भाभा ब) डॉ. होमी सेठना

क) डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम ड) डॉ. राजा रामण्णा

३) भारताने ..... यांच्या नेतृत्वाखाली विश्वचषक क्रिकेट स्पर्धा जिंकली.

अ) सुनील गावसकर ब) कपिल देव

क) सय्यद किरमाणी ड) संदीप पाटील

ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व लिहा. (३)

१) आंदोलन / संघटना — कार्य

१) चिपको आंदोलन - वृक्षतोड थांबविणे

२) लाटणे मोर्चा - महागाई व कृत्रिम टंचाई यांना विरोध

३) अरकविरोधी - भ्रष्टाचाराला विरोध

४) महिला दक्षता समिती - स्त्री अत्याचाराला विरोध

२) क्षेपणास्त्राचे नाव — उपयोग

१) पृथ्वी - जमिनीवरून जमिनीवर मारा करणारे क्षेपणास्त्र

२) अग्नी - जमिनीवरून पाण्याखाली मारा करणारे क्षेपणास्त्र

३) आकाश - जमिनीवरून आकाशात मारा करणारे क्षेपणास्त्र

४) नाग - शत्रुचे रणगाडे नष्ट करणारे क्षेपणास्त्र

३) व्यक्ती — कार्य

१) डॉ. एन. गोपीनाथ - ओपन हार्ट शस्त्रक्रिया

२) रामचंद्र शर्मा - कुशल कारागीर


३) डॉ. सुभाष मुखोपाध्याय - टेस्ट ट्यूब बेबी

४) डॉ. मोहन राव - पोलिओ


aglasem.com For more Question Papers, Sample Papers, Notes & Syllabus visit aglasem.com

प्र. २ अ) दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा. (कोणतेही –२) (४)


१)



२)



३)



ब) दिलेल्या संकल्पना स्पष्ट करा. (कोणतेही–२) (४)

१) अवकाश संशोधन

२) भारताचा अंतर्गत व्यापार

३) कुटुंब संस्था

प्र.३ पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतेही–२) (४)

१) महाराष्ट्रात स्त्री मुक्ती चळवळीस सुरूवात झाली.

२) पंडित नेहरूंनी अणुऊर्जा आयोगाची स्थापना केली.

३) भारतात पर्यटन उद्योग वाढीस लागला आहे.

४) भारतात पाणी पुरवठा योजना सुरू करण्यात आली.

प्र. ४ दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारीत प्रश्नांची उत्तरे लिहा. (४)

शहरात किंवा नागरी क्षेत्रात लोकवस्ती केंद्रीत होण्याच्या प्रक्रियेस शहरीकरण म्हणतात. नागरीकरण घडून येण्यास वाढीव लोकसंख्या हे एक महत्वाचे कारण आहे. हवा, पाणी, समूहजीवनासाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक व सामाजिक संस्था हे घटक नागरीकरणावर परिणाम घडवून आणतात.

(२)

स्वातंत्र्योत्तर भारताच्या संदर्भात नागरी लोकसंख्या वाढीची काही प्रमुख कारणे म्हणजे मृत्युदरातील घट, औद्योगिकरण, ग्रामीण भागातील रोजगाराची अनुपलब्धता, शहरातील रोजगार संधी व व्यापार, स्थलांतर ही होत.

१) शहरीकरण म्हणजे काय ? (१)

२) नागरीकरण घडून येण्यासंदर्भात महत्त्वाचे कारण कोणते ? (१)

३) भारताच्या संदर्भात नागरी लोकसंख्या वाढीची प्रमुख कारणे लिहा. (२)

प्र. ५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (६)

१) क्षेपणास्त्र निर्मितीमुळे भारत लष्करदृष्ट्या कसा सुरक्षित झाला ?

२) भारतात वनसंपत्तीवर आधारित कोणते व्यवसाय चालतात ?

३) संविधानाप्रमाणे कोणत्या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई आहे ?

४) भारतीय भाषांच्या बोलीभाषा जपणे का आवश्यक आहे ?

- राज्यशास्त्र -

प्र. ६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. (२)

१) भारताशी आंतरराष्ट्रीय सरहद्द खुली असणारा देश ..... आहे.
अ) पाकिस्तान ब) बांग्लादेश क) नेपाळ ड) म्यानमार

२) पुढीलपैकी कोणता दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरा केला जातो.
अ) शिक्षक दिन ब) बालदिन क) वसुंधरा दिन ड) ध्वजदिन

प्र. ७ पुढील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा. (कोणतेही दोन) (४)

१) संयुक्त राष्ट्रांमधील सर्व सदस्य राष्ट्रांचा दर्जा समान नसतो.

२) भारत-चीन संबंध मैत्रीपूर्ण आहेत.

३) निर्वासितांना आश्रय देण्यास राष्ट्रे सहज तयार होतात.

प्र. ८ अ) पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणतेही-१) (२)


१) मानवी हक्क

२) नकाराधिकार


https://www.maharashtrastudy.com

ब) पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा.(कोणतेही-१) (२)

१)



२)



प्र. ९ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही–१) (२)

१) भारत अमेरिका यांच्यात सहकार्याचे संबंध निर्माण होण्यामागील पार्श्वभूमी विशद करा.

२) संयुक्त राष्ट्रांची उद्दिष्टे लिहा.

* * *

https://www.pyqonline.com
Whatsapp @ 9300930012
Send your old paper & get 10₹ to 40₹
अपने पुराने पेपर्स भेजे और 10 रुपये से 40 रुपये तक पायें,
Paytm or Google Pay से